मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# दोन वेळा जगलेली मुलगी

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Janie Forest

रूपान्तरकार: Ruth Klassen
Alastair Paterson
अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2020 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तीं कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

याईर नावाचा एक यहुदी धर्मपुढारी होता, तो देवाची भक्ति करी आणि लोकांना देवाचे वचन शिकवित असे.



एके दिवशी याईराच्या जिवनात मोठे संकट आले. त्याची प्रेमळ मुलगी; केवळ बारा वर्षांची होती, ती आजारी पडली.

तिला बरे होण्यासाठी कोणीही मदत करु शकत नव्हते. कारण तिचा आजार फार वाईट होता. मुलगी मरणार आहे हे याईराला कळून आले होते.



याईराच्या मुलीला केवळ एकच व्यक्ति मदत करु शकत होता. येशूला घरि आणण्यासाठी याईर येशूच्या शोधात बाहेर पडला. याईरचे धर्मपुढारी मित्र येशूला



मान्यता देत नाही याची कदाचित याईराला कल्पना असावी.

परंतू याईराने या सर्वांकडे लक्ष दिले नाही. त्याची मुलगी मरण पावेल त्याच्या आधि तो तिला ताबडतोब मदत करु इच्छित होता.





याईराने येशूला लोकांच्या गराड्यात पाहिले. तो येशूला पाहून त्याच्या पाया पडला, आणि त्याने आग्रहाने विनवणी केली

की, ...



... "माझी लहान
मुलगी मरावयास
टेकली आहे;
तिने बरे होऊन
जगावे म्हणून
आपण येऊन
तिच्यावर
हात ठेवा."



येशू याईर सोबत गेला. परंतू येशूच्या
अवतीभोवती लोकांची फारच गर्दी
असल्यामुळे ते पुढे लवकर जाऊ
शकत नव्हते. तेथे एक स्त्री होती,
ती बारा वर्षांपासून आजारी होती.
ती सर्व वैद्यांकडे जाऊन आली
होती (आणि तिचा सर्व पैसा
तिने खर्च केला होता) परंतू
काहीच फरक पडला नव्हता.
ओह ! आता ती येशूला
पाहू इच्छित होती.



त्या स्त्रीने
काय केले असावे बरे? "जर मी ह्याच्या
कपड्यांना हात लावीन तरी मी बरी होईन.
असे ती आपल्या मनातल्या मनात म्हणत होती.
ती हळू हळू येशूजवळ जाऊ लागली. आणि मग तिचा
हात पुढे करुन तिने येशूच्या झग्याला स्पर्श केला.

चमत्कार ! चमत्कार ! ती स्त्री बरी झाली. तात्काळ ! पुर्णपणे ! तिला कळले की तिचा आजार निघून जाऊन ती पुर्णपणे बरी झाली आहे. परंतू त्यानंतर ऐक आवाज ऐकू आला, "मला कोणी स्पर्श केला?" असे येशूने विचारले. गर्दीतील लोक येशूला स्पर्श करित होते. परंतू जी स्त्री बरी झाली होती तिला माहित होते की तिने स्वतः विषयी सांगावे अशी येशूची अपेक्षा आहे. तेंव्हा त्या स्त्रीने भीत भीत व कांपत कांपत तीची सर्व गोष्ट सांगितली.



ऐवढ्यात, याईरच्या घरुन काही काम करणारी माणसे आली. ती काही बोलण्याच्या आधिच त्यांच्या दुःखीत चेहऱ्यांनी दुःखाची गोष्ट सांगितली असावी. ते याईराला म्हणाले, "तुमची मुलगी मरण पावली आहे." मरण पावली ! फारच उशिर झाला होता. त्या स्त्रीने उशिर लावला नसता तर कदाचित... कदाचित जर ... मरण पावली !



याईरची प्रिय चिमुकली आता या जगात राहिली नाही. येशूने जेंव्हा हे ऐकले, तो म्हणाला, "भिऊं नको; विश्वास मात्र धर, आणि ती बरी होईल." येशूवर विश्वास करणे याईरसाठी खरोखर किती कठिण झाले असावे. त्याची मुलगी मरण पावली होती.



त्याच्या घरि, सर्व लोक मुलीसाठी ओक्साबोक्शी रडून दुःख व्यक्त करित होते. येशू त्या रडणाऱ्यांना म्हणाला, "मुलगी मेली नाही तर झोपली आहे."



तेंव्हा ते त्याला हसू लागले. कारण मुलगी मेली आहे हे त्यांना माहित होते.

येशूने त्या सर्वांना बाहेर घालविले, नंतर मुलीच्या हातास धरुन तो म्हणाला, "मुली, उठ." याईर तेथेच होता. त्याची पत्नी देखिल तेथे होती. येशूचे तिन शिष्य देखिल तेथे होते. त्या सर्वांनी येशूचे शब्द ऐकले. ती मेलेली मुलगी देखिल येशूचे शब्द ऐकू शकेल का?



त्या मेलेल्या मुलीने येशूचा आदेश ऐकला ! तिचा आत्मा तिच्यात परतला, आणि ती लगेच उठून बसली. येशूने तिला मरणातून जिवंत केले होते.



मुलीचे आई–वडील आश्चर्यचकित झाले. येशूने त्या मुलिला काहीतरी खायला देण्यास सांगितले. त्यांना कित्ती आनंद झाला असेल; येशूचे त्यांनी कित्ती आभार मानले असतील.

त्याच्या अद्भुत प्रीतिने व सामर्थ्याने त्याने त्यांच्या मुलिला मरणातून परत जिवंत केले होते.



# दोन वेळा जगलेली मुलगी

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मार्क ५, लूक ८

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!
जॉन 3:16